शालार्थ क्रमांक नसलेल्या व मानधन तत्वावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्याबाबत (आर्थिक वर्ष २०२५-२६)

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक वेतन-१२२६/प्र.क्र.२२/टीएनटी-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च, २०२६

**संदर्भ** :- १. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. १२ मार्च, २०२६.
२. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचा दि.२३.०१.२०२६ रोजीचा प्रस्ताव.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळा, अशासकीय अनुदानित सैनिकी शाळा व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांमध्ये शालार्थ क्रमांक नसलेल्या व मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अशासकीय माध्यमिक शाळा, अशासकीय अनुदानित सैनिकी शाळा व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांमध्ये मानधन तत्वावर कार्यरत कर्मचारी यांना शालार्थ क्रमांक नसल्याने सदर कर्मचा-यांचे वेतन अदा करणे प्रलंबित होते. आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता वित्त विभागाने रु. ३००० इतकी लाक्षणिक पूरक मागणी मान्य केली असून सुधारित अंदाजाद्वारे लेखाशिर्ष क्र. २२०२०४४२, २२०२०४६९ व २२०२०४७८ अंतर्गत १० कंत्राटी सेवा या उद्दीष्ठामध्ये एकूण रु.६,३०,१३,०००/- (सहा कोटी तीस लाख तेरा हजार मात्र) इतका निधी उपलब्ध केला आहे.

अशासकीय माध्यमिक शाळा, अशासकीय अनुदानित सैनिकी शाळा व अशासकीय उच्च माध्यमिक शाळांमध्ये शालार्थ क्रमांक नसलेल्या व मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष क्र. २२०२०४४२, २२०२०४६९ व २२०२०४७८ अंतर्गत १० कंत्राटी सेवा या उद्दीष्ठामध्ये एकूण रु. ६,३०,१३,०००/- (सहा कोटी तीस लाख तेरा हजार मात्र) इतका निधी पुढीलप्रमाणे आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मंजूर व वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

( रु. हजारात)

| लेखाशीर्ष | उद्दीष्ट्य | सन २०२५-२६ करिता सुधारित अंदाजाद्वारे उपलब्ध तरतूद | वितरीत करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|
| २२०२ ०४४२ | १०- कंत्राटी सेवा | ७०१६ | ७०१६ |
| २२०२ ०४६९ | १०- कंत्राटी सेवा | ९७ | ९७ |
| २२०२ ०४७८ | १०- कंत्राटी सेवा | ५५९०० | ५५९०० |
| एकूण | | ६३०१३ | ६३०१३ |

३. यानुसार १० कंत्राटी सेवा अंतर्गत कर्मचाऱ्यांचे मानधन ही वेतनसदृश्य बाब असल्याने मानधन तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांचा नियुक्ती कालावधी व परिगणित केलेल्या मानधनाची रक्कम अचूक असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयुक्त शिक्षण, पुणे यांची राहील.

४. उपरोक्तप्रमाणे वितरित करण्यात येत असलेला निधी संबंधितांना वितरित करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी तथा आयुक्त शिक्षण, पुणे यांनी घ्यावी.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४७/व्यय-५, दिनांक २६/०३/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०३२७१७२६२८०९२१ हा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SNEHA AJIT CHURI

Digitally signed by SNEHA AJIT CHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=F42D97811491A4D74A653ABF2B917F3E03EE2F1E5FE8EB2583020F184922ED8F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=25CC2567047799737E6EF8EC33C165C825164E25B87CED9C4EEFD4B553807B86, cn=SNEHA AJIT CHURI
Date: 2026.03.27 17:27:55 +05'30'

( स्नेहा चुरी )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
८. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
९. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
१४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद
१६. शिक्षण निरिक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम),मुंबई
१७. सर्व वरिष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण विभाग)
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
२०. महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई
२१. संचालक, लेखा व कोषागारे,मुंबई
२२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२३. मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई

२४. उपसंचालक, लेखा व कोषागरे, पुणे नाशिक, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकणभवन, नवी मुंबई
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६. लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
२७. वित्त विभाग, नगर विकास विभाग,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
२८. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवड नस्ती (टीएनटी-३)